# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२४

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली शेजारील रस्ता रुंदीकरण करण्याबाबत

**(१) ११११५ (२०-११-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ८३४ ला दिनांक ४ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागठाणे विधानसभा क्षेत्रातील रहेजा वसाहत, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली शेजारील बॉटल नेक कमी करुन रस्ता रुंदीकरण करण्यासंदर्भातील मागणी मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी त्यांच्या दिनांक १३ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भातील एफआरऐ प्रमाणपत्र जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी महानगरपालिकेला पाठविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु रस्ता रुंदीकरणाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे व सदर काम कधीपर्यंत पूर्ण होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी कळविल्यानुसार आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणेकामी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागाचे अभिप्राय अद्यापि अप्राप्त आहेत. सदर कागदपत्रांची पूर्तता होऊन वन विभागाकडून "ना-हरकत" प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर रस्त्याचे काम करण्यात येणार आहे.

वनक्षेत्राने बाधित सदर रस्त्याचा भूभाग बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सदर रस्ता हस्तांतरीत झाल्यानंतर तो बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विकसित करण्यात येणार आहे.

---

## पारशिवनी (जि.नागपूर) नगरपंचायत अंतर्गत बेकायदेशीर अगरबत्ती कारखान्यांवर कारवाई करणेबाबत

**(२) १२६९० (३०-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारशिवनी (जि.नागपूर) नगरपंचायत अंतर्गत प्रभाग क्रमांक १७ मध्ये बेकायदेशीररित्या अगरबत्ती कारखाना गत ४ वर्षांपासून नागरी वस्तीत सुरू असून सदर कारखान्यातील अवजारांच्या आवाजामुळे निर्माण होणाऱ्या ध्वनी व वायु प्रदुषणामुळे परिसरातील रहिवाशांना त्रास होत असल्याच्या तक्रारी परिसरातील नागरीकांनी नगरपंचायतीला केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखान्यास देण्यात आलेले ना हरकत प्रमाणपत्र कालबाहय झाले असून कारखान्यामुळे पर्यावरणास बाधा पोहचत असल्याने सदरहू कारखाना बंद करून परिसरातील प्रदूषण रोखण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१९-०३-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) नगरपंचायत पारशिवनी यांचे पत्र क्रं नपपा/१४३८/२०२२ दिनांक ११/०१/२०२२ अन्वये सदर तक्रारीच्या अनुषंगाने नगरपंचायत पारशिवनी मार्फत अगरबत्ती कारखाना धारक श्री.राहुल पंचम तिल्लेकर यांना कारखाना रहीवासी भागातुन स्थलांतरीत करण्याची नोटीस देण्यात आली होती. तसेच नगरपंचायत पारशिवनी यांचे पत्र क्रं नपपा/१६६३/२०२२ दिनांक १७/०२/२०२२ अन्वये तक्रारदार श्रीमती किरण चंद्रभान पहाडे यांना कळविण्यात आले की, सदर अगरबत्ती कारखाना एमआयडीसी भागात स्थलांतरीत केला असल्याने तक्रार अर्ज निकाली काढण्यात आली आहे.

तसेच प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडुन दिनांक ०५/०१/२०२२ रोजी सदर उद्योगाची पाहणी करण्यात आली. पाहणी दरम्यान आढळुन आलेल्या त्रुटीच्या आधारे सदर उद्योगास या कार्यालयाकडुन प्रस्तावित निर्देश दिनांक १०/०१/२०२२ रोजी बजावण्यात आले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडुन दिनांक ०४/०८/२०२२ रोजी उद्योगाची पाहणी करण्यात आली, पाहणी दरम्यान सदर अगरबत्तीचा कारखाना चालु असल्याचे आढळुन आले नाही व अगबत्ती उत्पादन घेण्या संबंधीच्या कोणत्याही मशिनरी आढळुन आल्या नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील दिक्षाभूमीच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३) १२६९३ (२३-०५-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील दिक्षाभूमीच्या विकास कामासाठी राज्य शासनाने रुपये ३१० कोटींची योजना जाहीर करुन रुपये ४० कोटींचा निधी नागपूर सुधार प्रन्यास ला वर्ग केल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निधीला प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली नसल्यामुळे प्रशासकीय मंजुरी अभावी हा निधी अखर्चित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिक्षाभूमीच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर शहरातील दिक्षाभूमीच्या विकास कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०५-२०२४) :** (१) दिक्षाभुमी नागपूर येथील विकास करण्याकरीता शासनाने दिनांक ३१/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २००.३१ कोटीच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. यापैकी रुपये ११०.६८ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर कामाची ई-निविदा प्रक्रियापूर्ण करण्यात आली आहे.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील ऐतिहासिक स्मारक-वारसा स्थळांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत

**(४) १२७८० (३०-०३-२०२२) श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील ऐतिहासिक कस्तुरचंद पार्क, झिरो मॉईल स्मारक-वारसा स्थळांची देखभाल व दुरुस्ती अभावी दुरवस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरील स्मारक-वारसा स्थळांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी आवश्यक आराखडा तयार करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे,
नागपूर शहराच्या हद्दीतील शासन मान्य हेरीटेज सूचीनूसार कस्तुरचंद पार्क हे स्थळ अनु क्र. ९५ वर असून, ग्रेड-१ चे स्थळ आहे. तसेच या कस्तुरचंद पार्कची मालकी महसूल विभागाची आहे.
कस्तुरचंद पार्क या ऐतिहासिक छत्रीसदृष्य वास्तुची दुरूस्ती व जतन करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. १ यांनी रुपये ६० लक्ष चा आरखडा तयार केलेला आहे. सदर ऐतिहासिक वास्तुचे जतन करण्याकरीता आवश्यक रुपये ६० लक्ष निधी मिळण्याकरीता जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे हेरीटेज संवर्धन समितीने पत्र व्यवहाराद्वारे पाठपुरावा करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील नायर रुग्णालयात काम करणाऱ्या निवासी डॉक्टरांना कोविड भत्ता आणि महागाई भत्ता अदा करण्याबाबत

**(५) १६९५८ (२५-०३-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नायर रुग्णालयात काम करणाऱ्या निवासी डॉक्टरांना माहे जानेवारी, २०२२ पासून कोविड आणि महागाई भत्ता देण्यात आला नसल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील नायर रुग्णालयात काम करणाऱ्या निवासी डॉक्टरांना थकीत कोविड आणि महागाई भत्ता अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) व (२) मुंबईतील नायर रुग्णालयाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ व वरिष्ठ निवासी वैद्यकीय अधिकारी, प्रबंधक अधिकारी, आवासी वैद्यकीय अधिकारी यांना देण्यात येणाऱ्या माहे फेब्रुवारी, २०२२ ते ऑगस्ट, २०२२ या कालावधीतील कोविड भत्त्याचे अधिदान माहे एप्रिल, २०२३ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. तसेच त्यांना माहे मार्च, २०२३ पासून महागाई भत्ता देण्यात आला आहे व महागाई भत्त्याच्या थकबाकीचे कामकाज सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील इंद्रायणीनगर व मोशी येथील प्राधिकरणाचा मोकळा भूखंड विकसित करण्याबाबत

**(६) १७१५९ (२५-०३-२०२३) श्री.महादेव जानकर, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील इंद्रायणीनगर व मोशी येथील प्राधिकरणाच्या मोकळया भूखंडावर दररोज कचरा टाकणे, उघड्यावर शौचास बसणे आणि मद्यपान करणे यासारखे प्रकारामुळे स्थानिक रहिवाशांना त्रास होत असून सदरहू भूखंड विकसित न केल्यामुळे काही वर्षांपासून भूखंडाचा गैरवापर होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील इंद्रायणीनगर व मोशी येथील प्राधिकरणाचा मोकळा भूखंड विकसित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही. इंद्रायणीनगर व मोशी या भागात प्राधिकरणाच्या पेठ क्र.१ ते ११ व भोसरी डिस्ट्रीक्ट सेंटर या क्षेत्रांचा अंतर्भाव होत असून, यामधील प्राधिकरणाच्या अखत्यारमधील वाटपासाठी रेखांकनातील विविध प्रयोजनार्थ सुमारे ६३ रिकामे व विकसित भूखंड/जागा

आहेत. यापैकी बहुतांशी भूखंड / जागांना प्राधिकरणाने संरक्षक सिमाभिंत बांधलेली असून, तसेच जागेच्या संरक्षणासाठी सुरक्षारक्षक नेमलेले आहेत. त्यांचेमार्फत दैनंदिन जागांची पाहणी केली जाते. सदरचे भूखंड / जागांची स्थळ पाहाणी वेळी सदर जागेवर / भूखंडावर मोठ्या प्रमाणात कचरा/घाण तसेच जागेचा गैरवापर होत असल्याचे दिसून आले नाही. तसेच सदर मोकळ्या जागांची पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून वेळोवेळी साफ़सफ़ाई करण्यात येते.

(२) प्राधिकरणाच्या अखत्यारीतील ६३ भुखंडांमध्ये शैक्षणिक, खुली जागा, सार्वजनिक सुविधा, वैद्यकीय, वाहनतळ, वाणिज्य या प्रयोजनासाठी आरक्षित असलेल्या भुखंडाचा समावेश आहे. तसेच संपादित जमिनीच्या मोबदल्यात शेतकऱ्याला दयावयाचे १२.५% वाटपासाठीच्या भुखंडांचा देखील समावेश आहे. सदर भुखंडांचा विकास करुन त्याचे वाटप/ हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या पिसोळी गावातील ग्रामस्थांना जादा कर आकारला जात असल्याबाबत

**(७) १८९८३ (०८-०८-२०२३) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या पिसोळी गावातील ग्रामस्थांना जादा कर आकारला जात असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,ग्रामस्थांना जादा कर आकारल्यामुळे राज्यातील अन्य शेतकऱ्यांप्रमाणे त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आल्याने ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आाहे काय,

(३) असल्यास, ग्रामस्थांनी शासनाकडे ग्रामपंचायत नियमांप्रमाणे कर आकारणी करा, अन्यथा आमची ग्रामपंचायत परत करा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ग्रामस्थांच्या मागणीनुसार शासन स्तरावर कोणता निर्णय घेण्यात आला आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०४-२०२४) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही.

(४) पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट गावांतील मिळकतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२९ (अ) नुसार व महानगरपालिका ठरावाअन्वये दिलेल्या मान्यतेनुसार कर आकारणी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिकेंतर्गत अमृत योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(८) १९२७५ (११-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) नगरपालिकेंतर्गत केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त विद्यमाने अमृत योजना सहा वर्षापूर्वी मंजूर करुनही अद्याप शहरातील जलकुंभ, पाईप लाइनची कामे निधीअभावी अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेच्या मंजूरीस सहा वर्षांचा कालावधी होऊनही योजनेच्या अंमलबजावणीकरीता विहित वेळेत निधीची उपलब्धता न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अमृत योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत *तसेच काम पूर्ण* करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०४-२०२४) :** (१), (२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत भुसावळ शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पास मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून सदर प्रकल्पास केंद्र व राज्य हिश्यापोटी अनुज्ञेय निधी नगरपरिषदेस वितरीत करण्यात आलेला आहे.

सदर प्रकल्पातील जलशुद्धीकरण केंद्र व उद्धवाच्या जागेत बदल झाल्यामुळे कामास विलंब झालेला आहे. दरम्यानच्या कालावधीत भुसावळ नगरपरिषदेने पाणीपुरवठा प्रकल्पाचा तांत्रिक बदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत गठीत राज्यस्तरीय तांत्रिक समितीसमोर सादर केला होता.सदर बैठकीतील निर्णयानुसार या प्रकल्पाच्या रुपये ४८.२४ कोटी किंमतीच्या सुधारित प्रकल्प किंमतीस मान्यता देण्यात आलेली असून यामध्ये वितरण व्यवस्था व १० उंच जलकुंभाची कामे समाविष्ट असून सद्य:स्थितीत सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

योजनेतील उर्वरित कामे केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेली असून त्यास अनुसरून सुधारित अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तयार करण्यात आलेले आहे. सदर कामांचा प्रस्ताव केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत गठीत राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीच्या व केंद्र शासनाच्या नागरी व गृहनिर्माण कामकाज मंत्रालयाच्या शिखर समितीच्या मान्यतेनुसार याबाबतची पुढील आवश्यक कार्यवाही सुरू आहे.

---

## सोलापूर जिल्हा परिषदेत आंतरजिल्हा बदली अंतर्गत शिक्षक रुजु झाले नसल्याबाबत

**(९) १९८५५ (०८-०८-२०२३) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १७५१५ ला दिनांक २० मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषदांच्या ३ हजार ९४३ शिक्षकांच्या माहे ऑगस्ट, २०२२ रोजी आंतरजिल्हा बदल्या करण्यात आल्या परंतु अद्यापि बहुतांश जिल्हा परिषदांनी आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त केलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्हा परिषदेत आंतरजिल्हा बदलीने ६६ शिक्षक इतर जिल्ह्यात गेले मात्र इतर जिल्ह्यातुन १२२ शिक्षक सोलापूर जिल्ह्यात येणे अपेक्षित असताना फक्त ५९ शिक्षक आले असून अद्यापही ६३ शिक्षक रुजू झालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१७ ते सन २०२२ या कालावधीत आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्याचे प्रशासकीय आदेश निर्गमित करुन, प्रत्यक्ष कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करण्याबाबत ग्रामविकास विभागाकडून सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या असूनही अद्याप शिक्षक रुजू होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित शिक्षकांना रुजु करुन घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१२-०१-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

सन-२०२२ वर्षी जिल्हा परिषदेअंतर्गतच्या प्राथमिक शिक्षकांच्या सपूर्ण राज्यात ऑनलाईन संगणक प्रणालीव्दारे आंतरजिल्हा प्रक्रीया राबविण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सन २०१७ ते सन २०२२ या कालावधीत जिल्हा परिषद, सोलापूर अंतर्गत आतंरजिल्हा बदलीने सर्व-१२२ प्राथमिक शिक्षक हजर झालेले असून त्यांना रुजू करुन घेण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील खाणबाधित गावातील योजनांसाठी असलेलया खनिज निधीबाबत

**(१०) १९९१३ (०८-०८-२०२३) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खनिज उत्खननामुळे बाधित होणाऱ्या गावांच्या विकासासाठी संकलित करण्यात येणाऱ्या खनिज निधीतनू राज्याच्या मागील पाच वर्षात २ हजार २२६ कोटी रुपये विविध योजनांसाठी वितरीत करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निधीत ९८८ कोटी रुपये शिल्लक आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यामुळे शासनाने माहिती व निर्णय घेवून सदरील निधी खनिज क्षेत्रातील गावातील विकासकामांसाठी तातडीने वितरीत करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-०४-२०२४) :** (१) नाही.

राज्यात खनिज उत्खननामुळे बाधित होणाऱ्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्राच्या विकासाकरीता प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शासन अधिसूचना दिनांक ०१/०९/२०१६ अन्वये जिल्हा खनिज प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे.

जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खाण बाधित क्षेत्राच्या विकासाकरीता प्रधानमंत्री खनिज कल्याण क्षेत्र योजनेंतर्गत विविध विकास कामांना निधी मंजूर करण्यात आला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## पुणे जिल्ह्यातील कंत्राटी रुग्णवाहिका चालकांचे वेतन थकीत असल्याबाबत

**(११) २०६२७ (०८-०८-२०२३) श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुणे जिल्ह्यातील कंत्राटी रुग्णवाहिका चालकांचे मागील तीन ते चार महिन्यांपासूनचे थकीत वेतन न मिळाल्यास पालखी सोहळयावर बहिष्कार टाकून आंदोलन करण्याचा इशारा कंत्राटी रुग्णवाहिका चालक संघटनेने दिला असल्याची बाब माहे जून, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी रुग्णवाहिका चालक २४ तास आरोग्य विभागात सतर्कपणे काम करत असून गरोदर माता, अपघातग्रस्त, पोलिओ, मेडिसिन आणणे अशी विविध कामे करत असतानाही त्यांचे चार महिन्यांपासूनचे वेतन थकीत ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी असणाऱ्यांवर शासनाने कारवाई करून कंत्राटी रुग्णवाहिका चालकांना वेतन देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (०४-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही,

(२) व (३) मे.डीएच मॅनेजमेंट, मुंबई या सेवा पुरवठादराच्या सेवा पुरवठा आदेश रद्द समाप्त करण्याबाबत आणि कंत्राटी वाहन चालकांचे सद्य:स्थितीचे वेतन व मागील वेतन रोजदारी तत्वावर जिल्हास्तरावर अदा करण्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक यांना सहसंचालक (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियाना यांनी सूचना दिल्या आहेत.

(४) लागू नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयात कमी वजनाची बाळे जन्माला आल्याबाबतच्या आलेखात वाढ होत असल्याबाबत

**(१२) २११७७ (०५-०१-२०२४) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका रुग्णालयांत गत पाच वर्षांत ५२ हजार मुले कमी वजनाची जन्माला आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या कमी वजनाच्या मुलांच्या जन्मामागील कारणांचा वैद्यकीय व स्त्री आरोग्याच्यादृष्टीने विचार करण्याची गरज असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने तज्ज्ञांच्या सांगण्याप्रमाणे माहिती घेऊन कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालये व प्रसुतीगृहांमध्ये प्रसुती पुर्व तपासणी, प्रसुती व प्रसुती पश्चात तपासणी यांवर अधिक भर देण्यात येत आहे. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राज्य शासनाच्या खालीलप्रमाणे विविध योजना राबविण्यात येत आहेत:-

- जननी सुरक्षा योजना
- जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम
- प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान
- माता सुरक्षित तर घर सुरक्षित
- एनीमिया मुक्त भारत
- जागरुक पालक, सुदृढ बालक
- प्रधान मातृ वंदना योजना
- कुटुंब नियोजन योजना

वरील सर्व प्रयत्नांमुळे मागील २ वर्षांच्या तुलनेत सन २०२३ या वर्षात कमी वजनाची बालके जन्माला आलेल्या संख्येत सुधारणा झाल्याचे दिसून येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धाराशिव येथील पोलीस मुख्यालयासमोरील बेकायदेशीर बांधकाम परवानाबाबत

**(१३) २१५०० (०५-०१-२०२४) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव नगरपरिषदेंतर्गत श्री.प्रसाद रंगनाथ पाटील व सौ.पूजा प्रसाद पाटील यांचे बेकायदेशीर बांधकाम परवाना प्रकरणी आनंद नगर पोलीस स्टेशन येथे भा.दं.वी.४२० नुसार गुन्हा दाखल झाला असून जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी जा.क्र. २०२३ नुसार विद्यमान मुख्याधिकारी यांना प्रस्तुत प्रकरणातील मूळ संचिका उपलब्ध होत नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी अन्यथा विवादित संचिका उपलब्ध होत नसल्याबाबत गुन्हा दाखल करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक संचालक, नगररचनाकार, धाराशिव यांनी सादर केलेल्या अहवालानुसार महाराष्ट्र औद्योगिक नगररचना नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५१ नुसार कार्यवाही करून अनुपालन अहवाल कार्यालयास सादर करण्याबाबतचे लेखी पत्र मुख्याधिकारी यांना दिनांक २० फेब्रुवारी, २०२३ रोजी देवुनही विद्यमान मुख्याधिकारी यांनी दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३ व ५४ अन्वये दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी जा.क्र. ५०६/२३ नुसार नोटीस जारी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश कलम ५१ नुसारची नोटीस व विद्यमान मुख्याधिकारी यांची कलम ५३ व ५४ अन्वयेच्या नोटीशीमध्ये विसंगती दिसून येणे तसेच मा.न्यायालयाने स्पष्ट आदेश देवुनही विद्यमान मुख्याधिकारी यांनी दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी सदरील अनधिकृत, बेकायदेशीर बांधकामासबंधी कलम ५१च्या नोटीसऐवजी कलम ५३ व ५४ ची नोटीस देवुन सदर बांधकाम

पाडण्याऐवजी संबंधितांना बांधकाम करण्यास मदत केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यमान मुख्याधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) हे खरे नाही,

पोलीस मुख्यालयासमोर केलेल्या बांधकामाबाबत नगरपरिषद कार्यालयात दस्तऐवज आढळून न आल्याने, सदर बांधकामास बोगस बांधकाम परवानगी दिल्याचे निदर्शनास आल्याने तत्कालीन मुख्याधिकारी यांच्यावर आनंदनगर पोलीस स्टेशन, धाराशिव येथे दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी गुन्हा नोंद क्र.११७/२०२३ दाखल करण्यात आला आहे.

तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ व कलम ५४ नुसार संबंधित भुखंड धारकावर दिनांक २२ फेब्रुवारी, २०२३ रोजी नोटीस बजावण्यात आली. सदर नोटीशीस मा.जिल्हा न्यायाधिश (वरिष्ठ स्तर), दिवाणी न्यायालय, धाराशिव यांच्या दिनांक २३ मे, २०२३ रोजीच्या आदेशान्वये स्थगिती दिली. सदर आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे रिट याचिका (स्टॅम्प) क्र.२०५७५/२०२३ दाखल केली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही बसविण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

**(१४) २१५९८ (०५-०१-२०२४) श्री.सचिन अहिर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १८१३७ ला दिनांक १ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही बसविण्याची सुचना मा.मुंबई उच्च न्यायालयाने चार वर्षापूर्वी मुंबई महानगरपालिकेला दिल्यानंतर महानगरपालिकेने २४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात येऊन यासंदर्भात पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसून सुशोभीकरणावर १७०० कोटी रुपये खर्च करणाऱ्या महानगरपालिकेला शाळेच्या सी.सी.टी.व्ही साठी २४ कोटी रुपयांचा खर्च परवडत नसल्याचे कारणे देत सुधारित प्रस्ताव शिक्षण विभागास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास राज्यात लहान मुलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक खाजगी शाळेत सी.सी.टी.व्ही लावण्यात येत असतानाही तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्याची घोषणा करून दीड वर्षाचा कालावधी होऊनही तसेच बृहन्मुंबई

महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये अद्याप सी.सी.टी.व्ही लावण्यात न आल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षा धोक्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सी.सी.टि.व्ही. सर्वेक्षण व ई-निविदेच्या तांत्रिक कामाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करुन सर्वेक्षण पूर्ण करण्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, मुंबईतील महानगरपालिका शाळांत विद्यांर्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही लावण्याची मा.उच्च न्यायालय -मुंबई यांनी ४ वर्षांपूर्वी सूचना होती परंतु मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशाची अद्याप अंमलबजावणी झालेली नसून पालिकेतील काही शाळांत अल्पवयीन विद्यार्थीनीच्या शोषणाच्या घटना घडल्या असून यासंदर्भात विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेसाठी शासनाने माहिती व निर्णय घेवून मुंबईतील पालिका शाळांत तातडीने सीसीटीव्ही लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही. बसविणेबाबतचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ई-निविदा प्रक्रियेची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील पुर्णा नगरपरिषदेमध्ये विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याबाबत

**(१५) २१६२६ (०५-०१-२०२४) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील पुर्णा नगरपरिषदेकरीता मंजूर करण्यात आलेल्या पदांच्या आकृतीबंधामध्ये २ सिव्हील इंजिनिअर, १ अकाऊंटंट व १ ऑडीटर ही पदे मंजूर असतानाही आजपावेतो रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी जिल्हातील पुर्णा नगरपरिषदेमध्ये विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्यामुळे नगरपरिषदेमध्ये कामाचा ताण मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे, सदर सिव्हील इंजिनिअर, अकाऊंटंट व ऑडीटर व इतर पदे तात्काळ भरणे आवश्यक आहे त्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०८-०४-२०२४) :** (१) अंशतः खरे आहे,
पुर्णा नगरपरिषदेमध्ये स्थापत्य अभियंता पदाची २ पदे मंजूर असून दोन्ही पदे रिक्त आहेत. यापैकी एका पदाचा अतिरिक्त कार्यभार मानवत नगरपरिषदेच्या स्थापत्य अभियंता यांच्याकडे दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजीपासून देण्यात आला आहे. तसेच लेखापाल व लेखापरिक्षक सेवा संवर्गाची प्रत्येकी एक अशी

एकूण २ पदे मंजूर असून दोन्ही पदे भरलेली आहेत.
(२) राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयाद्वारे दिनांक ११ जुलै, २०२३ रोजी सरळसेवा पदभरतीसाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीनुसार माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये परीक्षा घेण्यात आली आहे. सदर परिक्षेच्या अनुषंगाने पुढ़ील कार्यवाही नगरपरिषद प्रशासन संचालनालय स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शासकीय सेवेतील पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत

**(१६) २१६३३ (०५-०१-२०२४) श्री.आमश्या पाडवी, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यशासकीयसेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांची पदोन्नती सेवाज्येष्ठतेनुसार करून कोट्यातील रिक्त जागा भरण्याचा सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ७ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये पदोन्नती मधील आरक्षण रद्द करण्यात आले असून, सदर निर्णयामुळे मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्यावर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासन निर्णय मागे घेऊन पूर्वीप्रमाणे पदोन्नती मधील आरक्षण लागू करण्यात यावे अशी मागणी मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासह लोकप्रिनिधींनी वारंवार शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पूर्वीप्रमाणे बढती मधील आरक्षण लागू करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ४/०८/२०१७ रोजी पदोन्नतीतील आरक्षणाबाबतचा दिनांक २५/०५/२००४ चा शासन निर्णय रद्द केला. मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ४/०८/२०१७ च्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिकेवरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून यापुढे पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त असलेली सर्व १०० टक्के पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दिनांक २५/०५/२००४ रोजीच्या सेवाज्येष्ठतेच्या स्थितीनुसार केवळ तात्पुरत्या स्वरूपात भरण्याचे आदेश दिनांक ७/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत. त्यानुसार मागासवर्गीय कर्मचाऱ्यांनाही सेवा ज्येष्ठतेने पदोन्नती देण्यात येत आहे.
(२) दिनांक ७/०५/२०२१ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार दिनांक २५/०५/२००४ रोजीची सेवाज्येष्ठता विचारात घेऊन मागासवर्गीय कर्मचाऱ्यांसह सर्वच कर्मचाऱ्यांना सेवाज्येष्ठता विचारात घेऊन पदोन्नती देण्यात येत आहे. मात्र सदर शासन निर्णय मागे घेऊन पूर्वीप्रमाणे बढती मधील आरक्षण लागू करण्यात यावे अशी मागणी मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचारी संघटना व इतर काही लोकप्रतीनिधींनी शासनाकडे केलेली आहे.

(३)पदोन्नती मधील आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ वर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिंगाडा पीकाला कृषी पीक म्हणून मान्यता देणेबाबत

**(१७) २१७१७ (०४-०१-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांकडून धानशेती सोबतच लहान लहान तलावांमध्ये मोठ्या प्रमाणात शिंगाडा पिकाचे उत्पादन करण्यात येत असून आयुर्वेदीक गुणधर्म असलेल्या शिंगाडा पीकापासून उच्च पोषणमुल्ये असणारे विविध पदार्थ बनविले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाच्या दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये अन्वये तुती रेशीम पीकास कृषी पीक म्हणून मान्यता प्रदान करण्यात आलेली असून यामुळे शासनाच्या विविध सवलती व लाभाचा फायदा तुती रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना वेळोवेळी मिळतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिंगाडा फळास अद्याप कृषी पीक म्हणून मान्यता मिळालेली नसल्याने सदरहू पीकाचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाच्या कोणत्याही योजना अथवा लाभाचा फायदा सद्य:स्थितीत होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिंगाडा फळाचा महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनिमयन) अधिनियम १९६३ मधील कलम ६२ मधील तरतुदीनुसार कृषी उत्पन्नाचे कलम २ (१अ) खालील अनुसूचीमध्ये समावेश केल्यास शिंगाडा पीकाचे उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजना व लाभांचा फायदा मिळू शकतो, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, ज्या प्रमाणे तुती रेशीम पीकास कृषी पीक म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली आहे, त्याच धर्तीवर शिंगाडा फळास देखील कृषी पीक म्हणून मान्यता प्रदान करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्राद्वारे मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.कृषी मंत्री, मा.पणन मंत्री यांचेकडे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, त्यानुषंगाने या प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, असल्यास त्याचा तपशील काय आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहे व याबाबतची कार्यवाही शासन किती कालावधीत करणार आहे,

**श्री.अब्दुल सत्तार (०७-०६-२०२४) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) मा.विधान परिषद सदस्य यांनी मा.उपमुख्यमंत्री यांना दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये शिंगाडा पीकास कृषी पीक म्हणून मान्यता प्रदान करण्याबाबत विनंती केली असून, सदर संदर्भ विभागास प्राप्त झाला आहे.

(६) त्याअनुषंगाने शिंगाडा पिकास कृषी पीक म्हणून मान्यता देण्याबाबत अपर मुख्य सचिव (सहकार व पणन) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०४/२०२४ रोजी सर्वंकष चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर इ. जिल्ह्यात शिंगाड्याचे पीक घेतले जात असून, शिंगाड्याचा महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनिमयन) अधिनियम, १९६३ मधील अनुसूची मध्ये समावेश करण्यासंदर्भात भंडारा जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून शिफारशी प्राप्त करुन पणन संचालनालयाने शासनास प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश दिले आहेत. सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पणन विभागाकडून शिंगाड्याचा अनुसूची मध्ये समावेश करण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येईल व शिंगाड्याला कृषी पीक म्हणून मान्यता देण्याची कार्यवाही विभागाकडून करण्यात येईल.

---

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेमध्ये निकृष्ट दर्जाचे शैक्षणिक साहित्याचे वाटप झाल्याबाबत

**(१८) २१७७६ (०५-०१-२०२४) श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.राम शिंदे, अ‍ॅड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ७२ मधील विद्यार्थ्यांना देण्यात आलेले रेनकोट, दप्तर इ. शैक्षणिक साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी केला असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळेमध्ये वाटप करण्यात येत असलेले साहित्य दर्जाहीन असून तेही सगळया विद्यार्थ्यांना मिळालेले नसून शैक्षणिक साहित्य मागण्यासाठी पालकांच्या अपरोक्ष विद्यार्थ्यांच्या सह्या बँकेच्या स्लीप वर घेतल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन करून नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ७२ मध्ये विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेले साहित्य निकृष्ट दर्जाचे देणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

•कारण नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत महानगरपालिका शिक्षण विभागाकरीता शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून DBT योजनेऐवजी National Payment Corporation of India (NPCT) यांच्या माध्यमातून ICICI बँकेकडील e-RUPI प्रणाली राबविणेबाबत ठराव क्र. ४४८७, दिनांक १६/०५/२०२३ अन्वये धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

•त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य पुरवठा करणेची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.

•सद्य:स्थितीत या वर्षाकरीता National Payment Corporation of India (NPCT) या योजनेतून गणवेश वगळून DBT योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.
•सन २०२४-२५ व २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरीता गणवेश निविदा प्रक्रिया राबविणेची कार्यवाही करण्यात आलेली आहे. जेणे करून नवी मुंबई महानगरपालिकेतील विद्यार्थ्यांना विहीत वेळेत गणेवश पुरवठा करणे शक्य होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील मेट्रो व मोनो रेल्वे स्टेशनवर बेरोजगार तरुणांना बुट पॉलिश उद्योग करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत

**(१९) २२५६६ (०५-०१-२०२४) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व मुंबई उपनगर येथे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली असल्यामुळे पश्चिम व मध्य रेल्वे स्टेशनवर बुट पॉलिश उद्योग करण्यासाठी परवानगी दिली असून त्याचप्रमाणे मेट्रो व मोनो रेल्वे स्टेशनवरही या बेरोजगार तरुणांना बुट पॉलिश उद्योग करण्यासाठी परवानगी मिळावी यासाठी मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेरोजगारांना मेट्रो व मोनो रेल्वे स्टेशनवर बुट पॉलिश उद्योग करण्यासाठी परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०२-०४-२०२४) :** (१) व (२) मा.लोकप्रतिनिधी यांचे दिनांक २५/१०/२०२३ रोजीचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे, हे खरे आहे. सद्य:स्थितीत महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ संचलित मुंबई मेट्रो मार्गिका २ अ आणि ७ यांवरील मेट्रो रेल्वे स्थानकांवर सुमारे ४६८ जागा विविध व्यवसाय आणि उद्योग यांच्यासाठी नव्याने तयार करण्यात येणाऱ्या धोरणामध्ये जागा चिन्हांकित करण्याचे विचाराधिन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विधी खात्यात आगाऊ रकमेच्या खर्चाची कागदपत्रे सापडत नसल्याबाबत

**(२०) २२५९५ (०५-०१-२०२४) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या करनिर्धारण व संकलन विभागातर्फे सन १९७८ ते २००९ या कालावधीत कर्मचारी प्रशिक्षण, पोस्ट कार्यालयाला आगाऊ पैसे, मालमत्ता कराच्या वसुलीकरीता सर्वेक्षण, मालमत्ता कराची देयके वितरित करणे तसेच कृषी कर यासह विविध कार्यालयीन कामांसाठी आगाऊ खर्च

करण्यात आला असून या आगाऊ रकमांची कागदपत्रे उपलब्ध होत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००८- २००९ या कालावधीत मालमत्ता कर देयके पाठविण्यासाठी स्टेशनरी वस्तू पुरवठ्याचा रुपये २२ लाख इतका खर्च, करनिर्धारण व संकलन खात्याच्या न्यायालयीन बाह्य प्रक्रियेसाठी रुपये दहा लाखांची आगाऊ मंजुरी अशा प्रकारे विविध कामांसाठी खर्च केलेल्या एकूण २७८ प्रकरणांमध्ये रुपये एक कोटी ७५ लाख ९६ हजार खर्चाची नोंद असणारी कागदपत्रे यात समाविष्ट आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एकूण ३१७ प्रलंबित आगाऊ रकमांच्या यादींपैकी रकमांचे विषय आणि नोंदी तपासून लेखा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यातील १४ आगाऊ रकमांचे लेखे बंद करण्यात आले असून २५ लेखे बंद करण्याची कार्यवाही सुरू आहे तर उर्वरित २७८ लेखे मूळ कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील मोठ्या प्रमाणात होत असलेला गैरव्यवहार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०४-२०२४) :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरण सन २०१७ साली निदर्शनास आल्यानंतर सदर कागदपत्रांचा शोध घेतला असता एकूण ३१७ प्रकरणांपैकी ३९ प्रकरणांची कागदपत्रे प्राप्त झाली आहेत. त्यातील १४ आगाऊ रकमांचे लेखे बंद करण्यात आले आहेत व २५ लेखे बंद करण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित २७८ प्रकरणांतील कागदपत्रे प्राप्त न झाल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांना सन २०१७ व सन २०२० या कालावधीत परिपत्रके पाठविण्यात आली होती. सबब कागदपत्रांअभावी लेखा तपशील निर्लेखित करण्याकरीता माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासक (स्थायी समिती) यांची मंजुरी प्राप्त झाली आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.